
# रजत निधी



ರಜತ ನಿಧಿ : ತುಕ್ಕಾರ ಹಾಸ್ಪಿಟಲ್‌ನ
ರಜತ ಮಹೋತ್ಸವ ಅಭಿನಂದನ ಗ್ರಂಥ
ವಿವಿಧ ಲೇಖನ / ಪ್ರಬಂಧಗಳ ಸಂಪುಟ

ಸಂಪಾದಕರು : ಡಾ. ಶ್ರೀನಿವಾಸ ಕುಲಕರ್ಣಿ

ಪುಟಗಳು : ೨೦೮ + VIII = ೨೧೬

ಪ್ರಕಾಶಕರು : ಡಾ. ಎಸ್.ಬಿ. ಕುಲಕರ್ಣಿ
ತುಕ್ಕಾರ ಹಾಸ್ಪಿಟಲ್ ರಜತ ಮಹೋತ್ಸವ ಸಮಿತಿ,
ಬೆಳಗಾವಿ

Rajat Nidhi : Commemoration volume of
Tukkar Hospital Silver Jubilee Celebration

Editor : Dr. Shreenivas Kulkarni

Pages : 208 + VIII = 216

Publisher : Dr. S.B. Kulkarni
Tukkar Hospital Silver Jubilee Celebration
Committe, Belgaum.

© ಸಂಪಾದಕರವು
© Editor :

ಪ್ರಥಮ ಮುದ್ರಣ : ೧೦-೧೧-೨೦೦೨
First Impression: 10-11-2002

ಬೆಲೆ : ರೂ. ೨೦೦/-
Price : Rs. 200/-

ಅಕ್ಷರ ಜೋಡಣೆ : ಇಂಪ್ರೆಶನ್ಸ್
ಬಿ-೨, ಅಕ್ಷರ ಆರ್ಕೇಡ,
೩೩೬೦/೪, ಗೋಂಧಳಿ ಗಲ್ಲಿ ಕ್ರಾಸ್ ರೋಡ
ಬೆಳಗಾವಿ - ೫೯೦ ೦೦೨
ಫೋನ : ೪೨೧೨೩೨

ಮುದ್ರಣ : ಇಂಪ್ರೆಶನ್ಸ್
ಬಿ-೨, ಅಕ್ಷರ ಆರ್ಕೇಡ,
೩೩೬೦/೪, ಗೋಂಧಳಿ ಗಲ್ಲಿ ಕ್ರಾಸ್ ರೋಡ
ಬೆಳಗಾವಿ - ೫೯೦ ೦೦೨
ಫೋನ : ೪೨೧೨೩೨

# राजन गवस यांच्या कादंबऱ्या

प्रो. वासुदेव सावंत

साहित्य अकादमी नवी दिल्ली आणि संस्कृती प्रतिष्ठानचा पुरस्कार मिळवून राष्ट्रीय पातळीवर दखलपात्र ठरलेले राजन गवस हे आजच्या पिढीतले एक महत्त्वाचे कादंबरीकार आहेत. १९८५ ते १९९८ या काळात 'चौंडक', 'भंडारभोग', 'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट' अशा त्यांच्या पाच कादंबऱ्या आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या आहेत. सामाजिक आशयद्रव्याची प्रभावी मांडणी हे या पाचही कादंबऱ्यांचे समान वैशिष्ट्ये असले तरी आशय आणि रूप या दोन्ही दृष्टीने 'चौंडक' आणि 'भंडारभोग' या दोन कादंबऱ्यांचा एक गट करता येतो, तर दुसऱ्या गटात 'धिंगाणा', 'कळप' व 'तणकट' या तीन कादंबऱ्यांचा एकत्रित विचार करता येतो.

१९६० नंतरच्या काळातील मराठी कादंबरीचे एक ठळक वैशिष्ट्ये सकृत्दर्शनीच जाणवते, ते म्हणजे मराठी कादंबरीचा विस्तारलेला अवकाश हे होय. मध्यमवर्गीय जीवनाशयाच्या पलिकडे जाऊन समाजातल्या विविध स्तरांचे, समूहांचे, सामाजिक वास्तवाच्या उपेक्षित अंगांचे, नवनव्या अनुभवविश्वांचे दर्शन घडविण्याची प्रेरणा या काळातल्या कादंबरीमध्ये प्रबळ झालेली दिसून येते. दलित, भटके, आदिवासी, कामगार, शेतकरी, मुस्लिम अणि सामाजातील तत्सम इतर अनेक घटक यांच्या चित्रणामुळे मराठी कादंबरीच्या भू-सांस्कृतिक कक्षा या काळात रुंदावलेल्या आहेत. राजन गवस यांची कादंबरीही मराठी कादंबरीच्या अवकाशाला नवी परिमाणे प्राप्त करून देणारी कादंबरी आहे. असे निश्चितपणे म्हणता येते.

'चौंडक' आणि 'भंडारभोग' या त्यांच्या प्रारंभीच्या दोन कादंबऱ्या समाजातल्या उपेक्षितांच्या अंतरंगाचे दर्शन घडविणाऱ्या समस्याप्रधान कादंबऱ्या आहेत. 'चौंडक' मध्ये देवदासीच्या जीवनाचे दर्शन घडविलेले आहे, तर 'भंडारभोग' ही जोगत्याचे जिणे पत्करावे लागलेल्या माणसांची, त्याच्या दुःख भोगाची अत्यंत प्रभावी कहाणी आहे. सामान्य माणसांच्या जगापेक्षा देवदासी आणि जोगते यांचे जगच वेगळे आहे. रुढ सामाजिक, सांस्कृतिक चौकटीच्या बाहेरचे हे जग आहे. दलित हे गावकुसाबाहेरचे म्हणून उपेक्षित आहेत, पण एक जात म्हणून तरी त्यांना सामाजिक व्यवस्थेत स्थान आहे, पण देवदासी आणि जोगते मग ते गावकुसाच्या आतले असोत किंवा बाहेरचे

त्यांना या समाजव्यवस्थेत कुठेच स्थान नाही. सर्व सामान्य व्यक्तीप्रमाणे माणसाचे नैसर्गिक आणि संसारी जीवन जगण्याचा त्यांचा अधिकार समाजाने हिरावून घेतलेला आहे. त्यामुळे देवदासी आणि जोगते यांच्या रुपाने होणारे व्यक्तीचे अमानुषीकरण दलितांच्या वेदनेपेक्षाही भयानक वाटू लागते. या अमानुषीकरणाचे जिवंत चित्र 'चौंडक' मधली 'सुली' आणि 'भंडारभोग' मधला 'तायाप्पा' यांच्या रुपाने गवस यांनी उभे केलेले आहे.

देवदासी आणि जोगते यांच्या जीवनाबद्दल या कादंबऱ्यातून येणारे वास्तव तपशीलच एवढे नाविन्यपूर्ण आहेत की केवळ शहरी वाचकांनाच नव्हे तर ग्रामीण भागातील वाचकांनाही अपरिचित वाटावेत. पण कादंबऱ्यांचे सामर्थ्य केवळ या नाविन्यपूर्ण तपशिलांपुरतेच मार्यादित नाही, तर सामाजिक प्रश्नांबद्दल वाचकांना अंतर्मुख करून विचार करायला लावणे हे या कादंबऱ्यांचे खरे सामर्थ्य आहे. देव आणि धर्म या संकल्पना व्यक्तीच्या शोषणाचे हत्यारही कशा बनतात, देव-धर्मविषयक भाबडी अंधश्रद्धा काहींवेळा व्यक्तीला हीनत्वाला पोहोचवू शकते हे या कादंबऱ्यातून समर्थपणे दाखविले जाते. अंधश्रद्धेच्या विळख्यात सामान्य माणसे अडकतात त्याला आर्थिक दैन्य व दारिद्र्यच कारणीभूत असले हे सामाजिक वास्तवाचे भानही लेखक येथे प्रकट करतो. दोन्ही कादंबऱ्यातले हे चित्रण पाहिले की गेली दीडशे वर्षे आधुनिकीकरणाच्या दिशेने जाणारा आणि आता एक विसाव्या शतकाकडे झेप घेऊ पाहणारा भारतीय समाज हाच आहे काय? असा प्रश्न उभा राहतो.

सुलीचे देववदासी होणे किंवा जोगत्याचा भोग तायाप्पाच्या नशिबी येणे या दोन्ही घटना घडतात, ते त्यांच्या कुटुंबियांच्या अगातिकतेमधून! आजार किंवा दारिद्र्य यासारख्या अडचणी दैवी उपायानेच नष्ट होतील या पारंपारिक श्रद्धेमुळे सुली आणि तायाप्पा यांना देवीला वाहिले जाते. पण या अंधश्रद्धेचा उगमही बराचसा परिस्थितीजन्य आहे. सुलीचा बाप (सुबाना) आपल्या मुलीला देवदासी म्हणून सोडायला प्रथम तयार नसतो. पण घरातले दैन्य, दारिद्र्य, आजार आणि त्यामुळे येणारी मानसिक अस्वस्था दूर करण्याचा दुसरा कोणताच उपाय उपलब्ध नाही म्हणून अगतिक होऊन शेवटी त्यालाही देवावरच विश्वास टाकावा लागतो. 'भंडारभोग' मधल्या तायाप्पाच्या चुलत्यालाही तायाप्पाला जोगता म्हणून सोडण्याचा अघोरी उपाय मान्य नाही. तायाप्पाचा चुलता आणि त्याचे कुटुंबिय यांच्यातला संघर्ष शेवटी कुटुंबाच्या उद्धवस्तेला कारणीभूत ठरतो.

देवाशी लग्न लावताना अजाण असणारी 'चौंडक' मधली सुली जसजशी मोठी होऊ लागते, तसतसा भोवतालच्या समाजाचा देवदासीकडे बघण्याचा दृष्टिकोन तिला

कळून येतो. कौटुंबिक वातावरणात वाढलेल्या मुलीला जाणतेपणी एका बहिष्कृताचे जगणे स्वीकारणे अतिशय अवघड वाटू लागते. समाजाने सुलीची अशी कोंडी केलेली आहे की विवाह करण्याचा तिचा नैसर्गिक हक्कही नाकारला गेलेला आहे आणि विवाहबाह्य संबधांतून पुरुषसहवास मिळवायचा प्रयत्न केला तरी तिला बदनाम ठरविले जाते. देवदासीचे अधः पतित जगणे वाट्याला आल्यामुळे शेवटी सुलीच्या आयुष्याचा नाश होतो आणि एकुलत्या एक मुलीच्या या अधःपातामुळे तिचे कुटुंबही उध्वस्त होते. देवदासीच्या आयुष्याचे हे भयानक दर्शन 'चौंडक' कादंबरी अत्यंत प्रभावीपणे घडवते. पण या वास्तवाचे केवळ तटस्थ निरीक्षण नोंदवून लेखक थांबत नाही. देव आणि देवावरची श्रद्धा या संकल्पनांवरच लेखक शेवटी आघात करतो. कादंबरीच्या शेवटी असह्य वेदनांनी तडफडणारी सुली देवीची परडी आपल्या पोटावर आदळते आणि देवीला शिवी हासडून "रांड, सगळं न्हेलंस, आता ह्यातनं मला बी न्हे." असे उद्‌गार काढते. देवीला शिवी हासडण्याची ही घटना लेखकाच्या मूल्यदृष्टीची सूचक आहे.

'चौंडक' मधली सुली देवदासी झाली तरी तिचे स्त्रीपण तरी अबाधित आहे. पण जोगता झाल्यावर 'भंडारभोग' मधल्या तायाप्पाला आपले पुरुषत्व नाकारून, साडी-ब्लाऊज, बांगड्या हा साज चढवून आयुष्यभर स्वतःला स्त्री समजूनच जगावे लागते. पुरुषाचे नॉर्मल आयुष्य बाजूला सारून लादले गेलेले स्त्रीत्व मिरविताना तायाप्पांच्या मनाला ज्या यातना होतात त्याचे चित्र 'भंडारभोग' मध्ये छोट्या छोट्या घटनांतून परिणामकारकपणे रंगविलेले आहे. 'जोगत्यानं जोगत्यासारखं वागावं. लईबी पुरुसपणा करू नये.' अशी लोकांची वाक्ये तायाप्पाच्या हृदयाला चिरत जातात. घरच्या माणसाकडूनही हेटाळणी सुरू झाल्यावर तायाप्पा घरदार सोडून जोगत्यांच्या वेगळ्या जगात प्रवेश करतो. मग त्याला कोणतीच कौटुंबिक नातीगोती उरत नाहीत. जोगत्यांचं जग हेच त्याचे कुटुंब बनते आणि जोगतीच नातेवाईक बनतात.

जोगत्यांच्या अनोख्या जगाचे चित्रण हे 'भंडारभोग' कादंबरीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. जोगत्यांचे पंथ, त्यांच्या पंथातील गुरुपरंपरा, जोगत्यांच्या जत्रा, त्यांचे मेळे, मेळ्यातल्या जोगतिणी, चौंडकवाले यांची एक वेगळीच दुनिया कादंबरीतून साकार होते. तायाप्पाप्रमाणेच म्हादू, राघू, यमन्या, तान्याप्पा अशी इतर जोगत्यांची व्यक्तिचित्रेही कादंबरीत समर्थपणे उभी केलेली आहेत. या पात्रांच्या द्वारे जोगत्यांचे दुःख, वेदना, त्यांची मानसिक उलाघाल, त्यांच्या वासनांना मिळालेलं विकृत रूप, जोगत्याचं फटकूरागत जगणं स्वीकारण्यामागची त्यांची अगतिकता अणि जोगत्यांना

दुसरे कुणीच सुहृद् नसतात या जाणीवेतून निर्माण झालेली परस्परांविषयीची आत्मियता याचे प्रभावी दर्शन 'भंडारभोग' मधून घडते.

पण जोगत्यांच्या जीवनातल्या या कारुण्याचे दर्शन घडविताना लेखक आपली परिवर्तनवादी नैतिकदृष्टीही व्यक्त करतो. कादंबरीच्या उत्तरार्धात देवदासी व जोगते यांचे प्रश्न मांडणाऱ्या चळवळीचे चित्रण येते. या चळवळीमुळे तायाप्पाला जोगत्याच्या प्रश्नाकडे पहाण्याची नवीच दृष्टी प्राप्त होते. चळवळीत सामील होऊन जोगत्यांना संघटित करण्याचे काम करतो. पण पांढरपेशा मंडळी केवळ श्रेय उपटण्यासाठीच या चळवळीत आलेली आहेत, हे पाहिल्यावर तायाप्पाचा भ्रमनिराश होतो. पण तायाप्पासारख्या सामान्य जोगत्याच्या मनातही नवी वैचारिक जागृत्ती होते हे दाखवून लेखकाने आपल्या परिवर्तनवादी, कृत्तीशील दृष्टीचा आविष्कार घडविलेला आहे. अशा प्रकारे समाजातल्या उपेक्षितांच्या प्रश्नांचे कृत्तीशील नैतिक दृष्टीतून प्रभावीदर्शन घडविणाऱ्या कादंबऱ्या म्हणून 'चौंडक' आणि 'भंडारभोग' या मराठीतल्या लक्षणीय कादंबऱ्या ठरलेल्या आहेत.

'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट' या तीन कादंबऱ्या वरील दोन कादंबऱ्यांच्या तुलनेत आशय आणि संरचनादृष्ट्याही वेगळ्या ठरतात. सामाजिक वास्तवाबद्दलचे लेखकाचे अवलोकन आणि आकलन पुढच्या तीन कादंबऱ्यातून अधिक व्यापक व प्रगल्भ होत गेलेले दिसून येते. गाव आणि गावाचे सामूहिक स्वरूप या तिन्ही कादंबऱ्यांच्या आशयाच्या केंद्रस्थानी आहे, पण गावाच्या या समाजवास्तवाचे दर्शन तरुण नायकांच्या प्रखर नैतिक भानातून घडविलेले आहे. त्यामुळे या कादंबऱ्यातून सामाजिक वास्तवाबरोबरच गावातल्या तरुणांच्या मानसिकतेचे त्यांच्या अस्वस्थतेचे प्रभावी चित्र उमटलेले आहे.

'धिंगाणा' ही कादंबरी एकीकडे घरच्या लोकांच्या दृष्टीने निकामी ठरलेल्या गावातल्या सत्ताकारणाचे महाभारत तिच्यातून चित्रित झालेले आहे. कादंबरीतले संगाप्पा, दादा, बाबल्या, संज्या, रिवाड हे सगळे अस्वस्थ, संतप्त तरुण असले तरी गावाबद्दल त्यांना आस्था आहे. गावातली तथाकथित प्रतिष्ठित माणसे गाव बिघडवत आहेत याची त्यांना चीड आहे म्हणून वर्षानुवर्षे सत्तेला चिटकून राहून गावाचे शोषण करणाऱ्या या प्रतिष्ठितांच्या विरोधात हे तरुण उभे राहू पाहतात. जुन्या आणि नव्या पिढीतला हा संघर्ष 'धिंगाणा' चे मुख्य आशयसूत्र आहे. एका अर्थाने प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धचा हा संघर्ष आहे.

पण हा प्रस्थापितांविरुद्धचा हा संघर्ष सोपा नाही. त्यामुळे या संघर्षात तरुणांना अपेक्षित यश मिळत नाही. मात्र ग्रामपंचायतीच्या निवडणूकीच्या निमित्ताने सत्ताधाऱ्यांना

खाली खेचण्याची संधी तरुण मंडळीना प्राप्त होते. गावातल्या निवडणुकीचे चित्रण हे 'धिंगाणा' कादंबरीचे एक लक्षणीय वैशिष्ट्य आहे. नानाविध तपशिलातून जिवंत होणारे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचे एवढे सांद्यत आणि वास्तव चित्र मराठी साहित्यात प्रथमच आलेले आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. 'धिंगाणा' मधील निवडणूकीचे आणि सत्ताकारणाचे हे वर्णन. भारतीय लोकशाहीचे आजचे वास्तव स्वरूप आपणापुढे उभे करून अंतर्मुखपणे विचार करायला लावते. निवडणूकीत सत्ताधाऱ्यांचा पराभव होऊन सत्तापरिवर्तन होते. पण सत्ता कारणाची मूळ प्रवृत्ती बदलत नाही, प्रस्थापित व्यवस्था बदलत नाही. त्यामुळे या निवडणूकीकडे एक मूल्यसंघर्ष म्हणून पाहणाऱ्या व या संघर्षात स्वतःला झोकून दिलेल्या कादंबरीच्या नायकाला या मूल्यसंघर्षात शेवटी आपण पराभूतच झालेले आहोत या सत्याची प्रचिती येते. नायकाचा या पराभवातून आजच्या किडलेल्या समाजवास्तवात पराभूत होणाऱ्या नैतिक मूल्यांचे वाचकांना अस्वस्थ करणारे दर्शन लेखकाने घडविलेले आहे.

'कळप' ही राजन गवसयांची एक महत्त्वाची कृत्ती आहे. भालचंद्र नेमाडे यांनी कादंबरीची व्याख्या करताना प्रदीर्घ भाषिक अवकाश, आशयसूत्रांचे अनेक पदर, विस्तृत संरचना, विशाल सामाजिक आशय, समाजाचा शोध, बळकट आशयसूत्रे, पोट समूहाचे व पोट संस्कृतीचे तपशिलांसह दर्शन अशी चांगल्या कादंबरीची अनेक वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. 'कळप' ही कमीअधिक प्रमाणात ही वैशिष्ट्ये सामावून घेणारी व नेमाडे यांनी केलेल्या कादंबरीच्या व्याख्येत बसू शकेल अशा प्रकारची कादंबरी आहे. या कादंबरीतली आशयसूत्रांची बहुविधता पहिली तरी तिने कवेत घेतलेल्या विस्तृत अवकाशाचे स्वरूप लक्षात येऊ शकते.

रघू चिलमी या तरुण नायकाची ही कहाणी आहेच, पण ती केवळ एका व्यक्तीची कथा नसून अनेक संदर्भाशी जोडली गेलेली आहे. तिच्यामध्ये सामाजिक चळवळीचे अंतरंगदर्शन जसे घडविलेले आहे. तसेच जिल्हा, तालुका, गाव पातळीपर्यंत पसरत गेलेल्या आजच्या साहित्यविश्वाचे प्रभावी चित्रण आहे. ग्रामीण भागातल्या धडपड्या, अस्वस्थ आणि बेकार तरुणांच्या चित्रणाबरोबरच ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्थेचे व तेथे काम करणाऱ्या लोकांचे दर्शनही तिच्यातून घडविलेले आहे. गावातल्या समूहजीवनाचे जसे चित्रण आहे तसेच व्यक्ती, कुंटुंब या पातळीवरचे माणसाचे जगणे आणि व्यक्तीला भोगाव्या लागणाऱ्या परिस्थितीजन्य व नियतिजन्य दुःखाची कहाणी ही या कादंबरीतून सांगितलेली आहे. राजन गवस वास्तवाकडे

समग्रतेच्या भूमिकेतून पाहातात त्यामुळे 'कळप' ही गावच्या संपूर्ण प्रोटसंस्कृतीचे दर्शन घडविणारी कादंबरी ठरते.

आशयाच्या या व्यापकतेपेक्षाही 'कळप'चे सामर्थ्य आहे ते तिच्यातून व्यक्त होणाऱ्या प्रखर नैतिक जाणिवांमध्ये, जीवनदृष्टीमध्ये म्हणून नायकाच्या मूल्यदृष्टीतून भेवतालच्या वास्तवातल्या मूल्यहीनतेचे चित्रण हेच 'कळप'चे मुख्य आशयसुत्र आहे, असे म्हणता येते. समाजातले कीडलेपण, दांभिकता, करियरीस्ट वृत्ती आणि एकूणच समाजातील अवमूल्ये यांच्यावर 'कळप' मधून प्रकाशझोत टाकला जातो. प्रस्थापितांकडे टीकात्मक नजरेन पाहणे हा 'धिंगाणा' प्रमाणेच 'कळप' मधल्या नैतिकदृष्टीचा एक महत्त्वाचा भाग आहे. या दृष्टीतूनच 'कळप' मध्ये देवदासी चळवळीचे व वाङ्मयीन चळवळीचे चित्रण आलेले आहे. सामाजिक चळवळीच्या नावाखाली तरुणांना राबवून घेऊन स्वतःची सत्ता आणि प्रतिमा बळकट करू पाहणाऱ्या मध्यमवर्गीय नेतृत्वावर 'कळप' मधून तीक्ष्ण हल्ला चढविलेला दिसून येतो. चळवळींच्या नेत्यांची करीयरीस्ट वृत्ती आणि दांभिकपणा येथे उघड केला जातो. १९८० नंतर महाराष्ट्रातल्या परिवर्तनवादी व पुरोगामी सामाजिक चळवळी हळूहळू का थंडावल्या याचे काही एक अनुमान 'कळप' मधील चळवळीच्या चित्रणावरून काढता येऊ शकेल. या अर्थाने 'कळप' हा एक सामाजिक दस्तऐवजही ठरू शकेल.

सामाजिक चळवळीप्रमाणेच वाङ्मयीन चळवळीही करीयरीस्ट प्रसिद्धीलोलुप आणि दांभिक लोकांच्याच हातात सापडल्यामुळे या चळवळीही तरुणांची दिशाभूल करणाऱ्या आणि त्यांच्या खऱ्या खुऱ्या प्रेरणांना मारून टाकणाऱ्या आहेत हेच चित्र 'कळप' मधून उभे केले जाते. सामाजिक आणि वाङ्मयीन चळवळी चालवणारांचे जसे कळप आहेत तसे आपल्या भ्रष्ट आचरणाने शिक्षणाची व शिक्षण व्यवस्थेची वाट लावून तरुण पिढीचे नुकसान करणारांचेही कळप आहेत. आपल्या प्रखर नैतिक भानामुळे या कुठल्याच कळपाशी जुळवून घेऊ न शकणारा कादंबरीचा नायक शेवटी या अपमूल्यांच्या असह्य ओझ्याखाली दडपून जातो.

'कळप' ही अशाप्रकारे नायक आणि त्यांच्या भोवतालचे सामाजिक वास्तव यांच्यातील मूल्यभेदाची कहाणी आहे. लेखकाने आपली जीवनदृष्टी या नायकाच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडलेली आहे. लेखकाच्या या जीवनदृष्टीला गावतल्या कृषीप्रधान संस्कृतीतून झालेल्या मूल्यसंस्कारांचा संदर्भ आहे. एकीकडे कृषीप्रधान संस्कृतीतून आलेले हे मूल्यसंस्कार व दुसरीकडे शहरीकरणामुळे आलेली तथाकथित आधुनिक मूल्ये हे द्वंद्व आजच्या ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांच्या मानसिकतेचा

एक अपरिहार्य भागच बनलेला आहे. या द्वंद्वाचे फार स्पष्ट प्रतिबिंब कळपमध्ये उमटलेले आहे.

'कळप' मध्ये ग्रामीण भागातल्या सामाजिक, वाङ्मयीन चित्र रेखाटले आहे तर 'तणकट' या कादंबरीत दलित चळवळीला ग्रामीण पातळीवर आज कोणते स्वरूप प्राप्त झालेले आहे याचे प्रत्ययकारी दर्शन घडविलेले आहे. दलित जाणीवेचे साहित्य आणि वैचारिक लेखन वाचून दलित चळवळीचे जे चित्र आपल्या मनात उमटलेले असते, त्या चित्राची पुनर्मांडणी करायला ही कादंबरी भाग पाडते. कारण दलितसवर्ण प्रश्नाकडे लेखक केवळ आयडियालॉजीच्या दृष्टीने पहात नाही, तर या प्रश्नाचे प्रत्यक्ष वास्तवातले स्वरूप काय आहे याच्या आधारे विचार करतो. दलित चळवळ ही आंबेडकरांना अभिप्रेत होती तशी सम्म्यक् क्रान्तीची चळवळ राहिलेली नसून अविचारी आक्रमकता आणि सत्ताकारण यामुळे तिची मूल्यांपासून कशी फारकत झालेली आहे हे 'तणकट' मधून दाखविले जाते. 'कळप' प्रमाणेच या कादंबरीतही चळवळीच्या नेतृत्वावर प्रखर हल्ला चढविलेला दिसून येतो. बाबासाहेबांच्या विचारांचा काहीही अभ्यास नसताना केवळ आरालावी भाषणे करून दलित तरुणांना भडकावणाऱ्या, दलित समाजाच्या संघटित शक्तीच्या आधारे सत्ताकारणात स्वतःचे स्थान बळकट करणाऱ्या व स्वतःची सौदेबाजी करण्याची शक्ती वाढवून घेणाऱ्या, चळवळीच्या नावाखाली स्वतःच्याच समाजाचे शोषण करणाऱ्या दलित नेतृत्वाचे खरेखुरे स्वरूप या कादंबरीतून उघड केले जाते. स्वतःच्या फायद्यासाठी स्वतःच्या समाजाचा वापर करणारे तालुका, जिल्हा पातळीवरचे नेते जसे 'तणकट' मधून दिसतात, त्याप्रमाणेच दलितांचा वापर करून गावकऱ्यांना शह देऊ पाहणारा व शेवटी दलितांना फसविणारा शेडंबाळेसारखा गावातला पातळयंत्री सवर्ण पुढारीही दिसतो. या सर्व मूल्यभ्रष्ट वातावरणात कबीरसारखा विचारी दलित तरुण एकाकी पडलेला आहे. पण कबीर किंवा आक्काबा राणे यासारखी विवेकी व समजंस माणसेच आजच्या दुभंगलेल्या समाजाला एकत्र सांधू शकतील असा विश्वासही कादंबरीतून व्यक्त होतो.

दलित व सवर्ण हे दोघेही गावातील समाजाचे दोन अन्योन्याश्रित घटक आहेत हे समजून दलित-सवर्ण प्रश्नाकडे पाहिले पाहिजे असे लेखक सूचित करतो. कादंबरीच्या शेवटी आलेल्या पुढील उद्‌गारातून ही भूमिका स्पष्ट होते. कबीरचा मित्र बल्हाळ म्हणतो, "म्हारवाडा मातीला जवळचा आहे. वास्तविक तुमच्या नेत्यानी हेच पहिल्यांदा ध्यानात घ्यायला हवं होतं की हा देश खेड्यांचा आहे आणि म्हारवाड्याची

सगळी मुळं खेड्यातल्या जमिनीत आहेत तेच विसरले सगळे आणि बोलत राहिले. मध्यमवर्गीय क्रांतीचे जाहीरनामे, मग घोषणा, मोर्चे, उपोषणे आणि चळवळ. सगळं शहरातल्या रस्त्यावर आणि वर्तमानपत्रातल्या कागदावर त्यांचा कधी संबंधच आला नाही तुझ्या म्हारवाड्याशी." (पृ. २३८)

'तणकट' ही कादंबरी अशा प्रकारे दलित-सवर्ण प्रश्नाकडे पहाण्याची एक नवी दृष्टी सुचित करते.

राजन गवस यांच्या या पाचही कादंबऱ्या वाचल्यावर त्यांच्या कादंबरी लेखनाची काही ठळक वैशिष्ट्ये आपणास जाणवतात.

पहिले वैशिष्ट्य म्हणजे गवस यांच्या कादंबऱ्या मराठीतील सामाजिक, वास्तवादी कादंबरी प्रवाहातल्याच, या प्रवाहाला विकसित करणाऱ्या कादंबऱ्या आहेत. गाव हेच त्यांच्या कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी आहे, पण गावाकडे ते समग्रतेच्या नजरेने पहातात. त्यामुळे अन्य समकालीन ग्रामीण-दलित लेखकांच्या तुलनेत त्यांच्या कादंबऱ्यांचा सामाजिक पाया अधिक विस्तृत आहे. त्यामुळे रूढ अर्थाने या कादंबऱ्या ग्रामीण किंवा दलित अशा कप्प्यामध्ये बसविता येत नाहीत.

समकालीन वास्तवावरची जबरदस्त पक्कड हे त्यांच्या कादंबऱ्यांचे एक ठळक वैशिष्ट्य आहे. समकालीन वास्तवांचे त्यांचे अवलोकन व आकलन व्यापक व सखोल आहे. वास्तवाचे भरगच्च तपशील त्यांच्या कादंबऱ्यातून येतात. पण या तपशीलांमुळे त्या कंटाळवाण्या होत नाहीत. कारण अनेकपदरी आशयसूत्रे असूनही कादंबऱ्यांचे शेवट व परिणामकारक करण्याचे कौशल्य त्यांच्या ठिकाणी आहे.

तरुण लेखकांमध्ये बहुतांशाने दिसणारा रोमँटिक स्वप्नाळूपणा गवस यांच्या कादंबऱ्यांत आढळत नाही. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड करणारे नायक यांच्या कांदबऱ्यातून येत असलेतरी या नायकाच्या चित्रणात रोमँटिक छटा आढळत नाहीत. कारण प्रत्यक्ष अनुभवलेल्या जगण्याशीच त्यांचे कादंबरीलेखन प्रामाणिक राहिलेले आहे.

त्यांच्या कादंबऱ्यातले जीवनवास्तवाचे आकलन जसे उत्तरोत्तर प्रगल्भ होत गेलेले आहे, त्याचप्रमाणे शैली व रचनातंत्र यादृष्टीने ही त्यांच्या कादंबऱ्या विकसित होत गेल्याचे दिसून येते. ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणाऱ्या असल्याने गवस यांच्या कादंबरीत बोली भाषेचा प्रभाव असणे स्वाभाविकच आहे. प्रमाण आणि बोली या भाषेच्या सीमारेषा त्यांच्या लेखनात पुसट झालेल्या दिसून येतात. 'चौंडक', 'भंडारभोग', या सुरुवातीच्या कादंबऱ्यांची भाषा काहीशी अवघड स्वरूपाची असली तरी नंतरच्या 'कळप' सारख्या कादंबरीत भाषेचा अधिक प्रभावी वापर केल्याचे

दिसून येते. बोलीभाषेची सामर्थ्ये आणि सौंदर्य 'कळप' सारख्या कादंबरीची भाषा सहजपणे व्यक्त करताना दिसते. गावातल्या बोलीचा मोकळेपणा, अकृत्रिमता, स्पष्टोक्ति, विनोद, उपरोध इत्यादी अनेक वैशिष्ट्ये त्यांच्या कादंबऱ्यांच्या भाषाशैलीतून व्यक्त होतात. वास्तवाची प्रामाणिक व प्रभावी अभिव्यक्ती साध्यण्यात गवस यांच्या कादंबरीची भाषा सक्षम ठरते.

समर्थ वास्तववादी आशयद्रव्य आणि त्याचा प्रखर नैतिक भानातून केलेला परिणामकारक आविष्कार यामुळे राजन गवस यांच्या कादंबऱ्या लक्षणीय ठरतात आणि मराठी कादंबरीचा अवकाश विस्तारून तिला कृत्तीशीलतेचे ठोस परिमाण प्राप्त करून देतात.

●●●